ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ पुणें, बुधवार तारीख २२ जुलै, १९५९ अंक २९

## विविध माहिती

**साध्या राहणीचा आदेश**—पाकिस्तानच्या अध्यक्षांनीं देशांत साध्या राहणीस उत्तेजन देण्यासाठीं सरकारी नोकरांच्या वागणुकीचे कांहीं नियम प्रसृत केले आहेत. उन्हाळ्यांत पुरुषांनीं बुश शर्ट व विजारी घालाव्या असा आदेश देण्यांत आला आहे. स्त्रियांनीं रेशमी वस्त्रांच्या ऐवजीं कापसाच्या कापडाचीं वस्त्रें वापरावीं आणि खान्याच्या प्रसंगीं दारू पिण्यास उत्तेजन देऊं नये अशी शिफारस नियमांत करण्यांत आली आहे.

**भारताला दोन कर्जें**—जागतिक बँकेनें भारताला दोन कर्जें देण्यास मंजुरी दिली आहे. त्यापैकीं एका कर्जाची रक्कम ५ कोटी डॉलर्सची असून तिचा विनियोग रेल्वेचा विकास करण्याकडे होणार आहे. दुसरें कर्ज १ कोटी डॉलर्सचें असून तें इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या संस्थेला मिळणार आहे.

**तेलखाणीविषयक तज्ज्ञ**—तेलखाणीविषयक यांत्रिक व रासायनिक कामाचें शिक्षण घेण्यासाठीं ३७ एंजिनिअरांची एक तुकडी रुमेनिआला पाठविण्यांत आली आहे. ह्यापूर्वी आणखी ९ जणांची एक तुकडी धाडण्यांत आली आहे. तेलाच्या कारखान्याची उभारणी आणि संचालन ह्यासंबंधींचें शिक्षणहि त्यांना देण्यांत येणार आहे.

**ताजमहालाच्या प्रतिकृतींची मागणी**—ताजमहालाच्या छोट्या प्रतिकृतींची एक मोठी मागणी पश्चिम जर्मनीकडून आग्रा येथील एका कंपनीला मिळाली आहे. ह्या प्रतिकृती दोन इंचांच्या करण्यांत येणार असून त्यासाठीं ७०० कामगारांना कामावर घेण्यांत आले आहे. हे नमुने कलापूर्ण पेट्यांतून पाठविण्यांत येणार आहेत. दरसाल सुमारें १० लाख रुपये किंमतीच्या प्रतिकृती परदेशीं निर्यात करण्यांत येतात.

**२६ वर्षें चाललेलें नाटक**—हॉलिवुड येथें १९३३ पासून करण्यांत येत असलेल्या एका नाटकाचा अखेरचा प्रयोग ता. १० ऑक्टोबरला होणार आहे. हें नाटक फार दिवस चालणार नाहीं असा नाट्यटीकाकारांचा अभिप्राय होता. पण त्यानंतर त्याची लोकप्रियता वाढत गेली व सुमारें ४० लाख लोकांनीं नाटकाचा प्रयोग पाहिला. कित्येकांनीं तर तें अनेकदां पाहिलें.

**३ लाख इटालिअन कैद्यांची मुक्तता**—इटालिअन सरकारनें ३ लाख कैद्यांच्या मुक्ततेचा हुकूम काढला आहे. हे सर्व कैदी राजकीय स्वरूपाचे होते. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीस इटलीमधील चमत्कारिक परिस्थितींत हजारों लोक एकमेकांविरुद्ध लढले होते. त्यांच्यावरील राजकीय खटले साठून राहिल्यामुळें हा निर्णय घेण्यांत आला.

**अधिकाऱ्यांना भेटी देण्याची प्रथा**—रशिअन कम्युनिस्ट पक्षाच्या ‘प्रवदा’ पत्रानें सरकारी अधिकाऱ्यांना भेटी देण्याची प्रथा रशिआंत वाढत असल्याबद्दल कडक टीका केली आहे. ह्या प्रथेमुळें वशिलेबाजी वाढते, कामांत चालढकल करण्यांत येते, एकमेकांच्या चुकांवर पांघरूण घालण्याची प्रवृत्ति वाढीला लागते, अशी टीका करण्यांत आली आहे. कम्युनिस्ट समाजाच्या उभारणीला ही प्रथा घातक असल्याचेंहि स्पष्टपणें सांगण्यांत आलें आहे.

**आकाशाच्या संशोधनासाठीं खर्च**—ब्रिटिश सरकारनें आकाशाच्या संशोधनासाठीं आणखी ५५,००० पौंडांची रक्कम मंजूर करण्याचें ठरविलें आहे. अग्निबाणांतून आकाशांत सोडण्यांत येणाऱ्या यंत्रांचे नमुने कसे असावेत ह्यासंबंधींचें संशोधन करण्यांत येणार आहे. ह्या बाबतींत अमेरिकन शास्त्रज्ञांचें सहकार्यहि घेण्यांत येणार आहे.

**वारल्यांचा निकृष्ट आहार**—मुंबई सरकारच्या आहार-खात्यानें ठाणें जिल्ह्यांतील वारली जमातीच्या आहाराची तपासणी केली असतां असें आढळून आलें कीं पोषणाच्या दृष्टीनें त्यांचा आहार अतिशय निकृष्ट दर्जाचा आहे. मुलांच्या बाबतींत हा निष्कर्ष अधिकच खरा आहे. वारली लोकांचीं मुलें त्यांच्या वयाच्या मानानें फार खुरटीं असतात, असें दिसून आलें.

**खतांच्या कारखान्यासाठीं सहकार्य**—हिंदी कारखानदारांशीं सहकार्य करून भारतांत खताचे कारखाने काढण्यास अमेरिकेंतील कांहीं प्रसिद्ध रासायनिक कारखाने तयार आहेत. अशा कारखान्यांसंबंधी तज्ज्ञांचा अहवाल सरकारकडे आला आहे. उद्योगपती बिर्ला हे आंध्र, राजस्थान व दुर्गापूर ह्या ठिकाणीं खतांचे कारखाने काढण्याच्या खटपटींत आहेत.

**राजकीय तनखा चालू ठेवला**—नागपूरचे रघोजीराव भोसले ह्यांना दरसाल ६०,००० रुपये तनखा व राजाबहादुर ही पदवी होती. ते वारल्यावर त्यांचे वडील पुत्र श्रीमंत फत्तेसिंगराव भोसले ह्यांनाहि तनखा व पदवी चालू ठेवण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे राजकीय तनखा वारसाला संपूर्णपणें चालू ठेवल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे.

**मराठवाड्यांतील विडी कामगार**—मराठवाड्यामधील विडीच्या धंद्यांत काम करणाऱ्या कामगारांसाठीं किमान वेतन सुचविण्यासाठीं मुंबई सरकारनें कमिटी नेमली होती. कमिटीनें ह्या बाबतींत केलेल्या शिफारसी सरकारनें मान्य केल्या आहेत. मराठवाड्याच्या पांच जिल्ह्यांतील ५,००० कामगारांना ह्या शिफारसींचा फायदा मिळणार आहे.

## Higher Diploma in Co-operation

**Results of the Examination for the Higher Diploma in Co-operation held in April 1959.**

**First Class**

R. K. Pitalia, M. M. Mokadam, A. C. Desai, V. J. Dabri, S. K. Hatolkar, Mohd. Yusuf, J. B. Bedre, I. S. Patel, K. M. Parekh, S. T. Oka.

**Second Class**

J. K. Patel, G. G. Oka, G. B. Dalal, S. D. Rajhansa, S. V. Bhalerao, M. V. Gadgil, H. V. Hazare, R. C. Deshatti, N. R. Sawant, B. T. Siglikar, V. S. Datalkar, W. P. Kukda, M. B. Joshi, M. M. Vyas, M. V. Katre, B. K. Dhamankar, K. K. Thakore, B. M. Wasu, S. K. Bobde, M. G. Dhotarkar, N. A. Sarnobat, V. R. Jagtap, S. D. Nikam, R. D. Shah, D. M. Raje, C. K. Shah, M. Q. Baxi, B. N. Pimple, R. M. Dube, G. R. Mande, M. V. Chine, M. B. Salodkar, . \. V. Gohel, V. L. Kharche, B. A. Joshi, M. Y. Naik, V. G. Kelkar, A. H. Shaikh, G. P. Bhilkar, V. T. Kumbhojkar, R. G. Kumbhare.

**Pass Class**

B. G. Salve, P. K. Kohale, S. Y. Lulay, (S.) T. Bhatt, N. K. Bannore, S. V. Sanghavi, K. R. Bidarkar, M. T. A. Khan, K. G. Datey, P. S. Kotibhaskar, B. K. Pande, S. K. Patel.

**Pass with Exemptions**

B. C. Kadakia (with exemptions in Book-keeping and Accountancy and Advanced Accountancy and Auditing).

**Repeater**

Shri P. R. Shukla (with exemptions in Theory, History and Practice of Co-operation, Co-operative and Other Laws and Book-Keeping and Accountancy).

**Prizes**

| Name of Donor | Amount of Prize Rs. | To whom awarded | |
|---|---|---|---|
| 1. Bombay State Co-op. Bank. | 100/- | Shri R. K. Pitalia | Highest No. of marks 498 out of 750. |
| 2. Bombay State Industrial Co-operative Association. | 50/- | Shri R. K. Pitalia | Highest No. of marks in optional subject of Industrial Co-operation 131 out of 2[illegible]0. |

P. M. Chengappa,
Principal, The Co-operative
Training College, Poona 1.

### आकाशवाणीवर 'पडसाद'

श्री. श्री. वा. काळे ह्यांनीं लिहिलेली "पडसाद" मालिका आकाशवाणीवर ध्वनिक्षेपित होणार आहे. त्यांतील पहिले पडसाद बुधवार दि. २२ रोजीं 'गृहिणी' मध्यें ध्वनिक्षेपित होतील.

### बँकेंतील संप मोडण्यासाठी परदेशांतून नोकरांची आयात

नॅशनल आणि ग्रिंडलेज बँक व्यवस्थापकांनीं आपल्या रंगून, पूर्व आफ्रिका आणि मुख्य कचेरी लंडन येथून ३४ विदेशी नोकर बँकेंतील संप मोडण्यासाठी आयात केले आहेत, अशी तक्रार ऑल इंडिया बँक एम्प्लॉईज असोसिएशचे अध्यक्षांनीं मध्यवर्ती कामगार मंत्र्यांचेकडे समक्ष केली आहे. बँकेच्या भारतांतील सर्व शाखांमधील नोकर गेले २१ दिवस संपावर आहेत.

---

### पंजाबी-रशियन शब्दकोश तयार

वैज्ञानिक, राजकीय व वाङ्मयीन वगैरे क्षेत्रांतील ३० हजार शब्दांचा पंजाबी-रशियन शब्दकोश मॉस्कोंत तयार करण्यांत आलेला आहे. त्याप्रमाणेंच रशियन-उर्दू शब्दकोशहि प्रसिद्धी-साठीं तयार आहे. तामीळ-रशियन, आसामी-रशियन, तेलुगु-रशियन आणि मराठी-रशियन शब्दकोश तयार करण्याचें काम जोरांत सुरू आहे. १९५३ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या हिंदी-रशियन शब्दकोशाची सुधारून वाढविलेली आवृत्ति छापण्याचें काम तूर्त चालू आहे.

---

**जपानी राजघराण्याची दौलत**—जपानच्या राजघराण्याचें खाजगी जडजवाहर व इतर दौलत येत्या नोव्हेंबर महिन्यांत प्रथमच सार्वजनिक रीत्या दाखविण्यांत येणार आहे. ह्या दौलतीचें एक प्रदर्शनच भरविण्यांत येणार आहे. गेलीं कित्येक शतकें ही दौलत पश्चिम जपानमधील नारा ह्या शहरांतील पदार्थसंग्रहालयांत ठेवण्यांत आली होती. नारा शहर जपानची पूर्वींची राजधानी आहे.

**कोचीन येथील बोटबांधणीचा कारखाना**—भारतामधील बोटी बांधण्याचा दुसरा कारखाना कोचीन येथें उभारण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या कारखान्यासाठी आर्थिक व तांत्रिक साह्य देण्याची तयारी जपाननें दाखविली आहे. कारखान्यासाठी एकूण २० कोटी रुपयांचा खर्च येणार असून त्यापैकी १० कोटी रुपयांची रक्कम परदेशीय चलनांत लागणार आहे.

**पोलादाचें फाजील उत्पादन**—अमेरिकेंतील पोलाद कार-खान्यांत झालेला संप अल्पकालीन ठरला तर त्यामुळें पोलादाच्या धंद्याचा फायदाच होईल. कारण अमेरिकेंत पोलादाचें फाजील उत्पादन झालें आहे. अमेरिकेला लागणारा पोलादाचा तीन महिन्यांचा सांठा आजच शिल्लक आहे. तथापि ह्या संपामुळें रेल्वे-वाहतूक व कोळशाच्या खाणीवर परिणाम होऊन त्यामधील कामगारांना बेकारीची झळ लागणार आहे.

**चीन अणु बॉंब बनविणार**—चीनचे परराष्ट्रमंत्री जनरल चेन यी ह्यांनीं एक वर्षापूर्वीं असें सांगितलें होतें कीं चीन लवकरच स्वतःच अणु बॉंब बनवील. आतां उत्तर व्हिएटनामचे अध्यक्ष होचि मिन्ह ह्यांनीहि अशीच माहिती दिली आहे. चीन स्वतःच्या अणु बॉंबच्या स्फोटाची तयारी झपाट्यानें करीत असून लवकरच त्याची चांचणी होईल असें निरीक्षकांचें मत आहे.

**डलेस ह्यांचें स्मारक**—अमेरिकेचे दिवंगत परराष्ट्रमंत्री मि. जॉन फॉस्टर डलेस ह्यांनीं आपल्या कारकीर्दींत सरकारी कामासाठी म्हणून ५ लाख मैल विमान प्रवास केला. वॉशिंग्टन येथें बांधण्यांत येणाऱ्या नव्या विमानतळाला त्यांचें नांव देण्यांत येणार असल्याचें अध्यक्ष आयसेन होअर ह्यांनीं जाहीर केलें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २२ जुलै, १९५९





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## उद्योगधंद्यांतील कामगारांच्या स्थानाविषयीं विचार

हिंद सरकारचे मजूर आणि नियोजनमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा पश्चिम जर्मनी, युगोस्लाव्हिआ व ब्रिटन ह्या देशांचा दौरा करून परतले आहेत. दौर्‍यांतील आपल्या निरीक्षणाचा व अभ्यासाचा निष्कर्ष सांगतांना ते म्हणाले कीं, भारतामधील उत्पादन वाढविण्यासाठी उद्योगधंद्यांच्या कामकाजांत कामगारांना अधिक प्रमाणांत सहभागी करून घेण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठी संयुक्त सहकारी शेतीचा अवलंब करण्यांत आला पाहिजे. पश्चिम जर्मनीमध्यें कामगार कारखान्यांच्या कारभारांत मोठ्या उत्साहानें भाग घेतात. त्याचप्रमाणें युगोस्लाव्हिआंतहि उद्योगधंद्यांवर कामगारांचें बरेंच नियंत्रण असतें. ह्या दोन्ही देशांनीं आर्थिक क्षेत्रांत त्यामुळें चांगलीच प्रगति करून दाखविली आहे. ब्रिटननेंहि उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रयोग यशस्वी करून दाखविला आहे. तथापि, ब्रिटनमधील प्रगति अपेक्षेइतकी झालेली नाहीं. कारण कारखान्यांतील नोकरशाहीमुळें कामगारांत पुरेसा उत्साह दिसून येत नाहीं. त्याचबरोबर कामगारवर्गांत राष्ट्रीयीकरणाबाबत अद्याप योग्य ती वृत्तीहि निर्माण झालेली नाहीं. युगोस्लाव्हिआंत उद्योगधंद्यावरील कामगारांच्या नियंत्रणाची जी पद्धत चालून देण्यांत आलेली आहे, ती भारतांत जशीच्या तशी अंमलांत आणण्यासारखी नाहीं. कारण, भारतामधील परिस्थिति कांहींशीं भिन्न आहे. तरीपण त्या पद्धतीमधील कांहीं बाबी घेण्यासारख्या आहेत. भारतांत कामगारांना तांत्रिक शिक्षण देण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें आपल्या जबाबदार्‍या व कर्तव्यें ह्यांच्याबद्दल त्यांना अधिक जाणीवहि करून देण्यांत येत आहे. कामगारांना उद्योगधंद्यांच्या कारभारांत अधिक प्रमाणांत सहभागी करण्याची पद्धत यशस्वी ठरावयाची असेल तर हें सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेचें शिक्षण त्यांना आणखी विस्तृत रीत्या देण्यांत आलें पाहिजे.

कामगार आणि त्यांचा मालक ह्या दोघांनाहि स्वार्थापेक्षा देशाच्या हिताला अधिक महत्त्व देण्याचें शिक्षण देण्यांत आलें पाहिजे. किरकोळ भांडणानें कांहींच साध्य होणार नाहीं हें त्यांना पटवून देण्यांत आलें पाहिजे. त्यांनीं जर हेतुपूर्वक सहकार्य केलें तर दोघांचाहि खूपच फायदा होईल ह्यांत मुळींच शंका नाहीं युगोस्लाव्हिआंत संयुक्त मालकीची सहकारी शेती स्थापन करण्यांत आली. ह्या प्रयोगांत प्रथम शेतकर्‍यांवर सक्ति करण्यांत आली. त्यामुळें तो यशस्वी झाला नाहीं. आतां शेतकर्‍यांवरील सक्ति रद्द करण्यांत आली असल्यानें स्वेच्छेनें सहकारी शेतीचा अवलंब करण्यांत येत आहे. त्यामुळें युगोस्लाव्हिआच्या शेतीच्या उत्पादनांत चांगली वाढ झालेली आहे. युगोस्लाव्हितांतील शेतकर्‍यांनीं आतां सहकारी शेतीची नवीन पद्धत सुरू केली आहे. तींत नियमांचा कांटेकोरपणा जाचक होण्याइतका कडक नाहीं. ह्या पद्धतींत एक प्रकारचा लवचिकपणा नव्हे एक प्रकारची शिथिलता आहे असें म्हटलें तरी चालेल. त्यामुळें अधिकाधिक शेतकरी संयुक्त सहकारी शेतींत सामील होत आहेत. ह्या प्रकारच्या शेतीला सरकारतर्फे बर्‍याच सवलती मिळतात. त्याचा परिणाम उत्पादन–वाढींत होतो आणि पर्यायानें सामील झालेल्या शेतकर्‍यांना मिळतो. युगोस्लाव्हिआंत पुष्कळ शेतकर्‍यांनीं आपली जमीन सहकारी शेतांना खंडानें दिलेली आहे, आणि स्वतः ते शहरांत कामधंदा करण्यासाठी निघून गेलेले आहेत. एखाद्या शेतकर्‍याला सहकारी शेतींतून बाहेर पडावयाचें असेल तर त्याला तसें करतां येतें. मात्र त्याला दोन्हींपैकीं एका गोष्टीला कबुली द्यावी लागते. अशा शेतकर्‍याला आपली जमीन सहकारी संघटनेला खंडानें तरी द्यावी लागते, किंवा, तसें करावयाचें नसल्यास नुकसानभरपाई घेऊन आपला मालकी हक्क सोडून द्यावा लागतो. भारतामधील शेतीचें उत्पादन वाढविण्यास संयुक्त सहकारी शेती हाच एक उपाय सांगण्यांत येत आहे.

---

## विनातिकिट प्रवासामुळें होणारें नुकसान

सेंट्रल रेल्वे मझदूर संघानें माटुंगा येथें तिकिटें तपासणार्‍या मध्य रेल्वेवरील नोकरांची दुसरी परिषद भरविली होती. ह्या परिषदेचें उद्घाटन श्री. शहानवाझ खान, रेल्वे-उपमंत्री, ह्यांनीं केलें. त्यांनीं ह्या प्रसंगीं केलेल्या भाषणांत भारतामधील रेल्वेंतून विनातिकिट प्रवास करणारांची जी माहिती सांगितली ती खेदजनक आहे. ते म्हणाले की, विनातिकिट प्रवास करणें हा एक प्रकारचा रोगच लोकांना झालेला आहे. ह्या बाबतींत लोकांनीं सहकार्य करणें अतिशय आवश्यक आहे. तिकिटें तपासणार्‍या नोकरवर्गाचें काम सुखाचें तर नाहींच, पण तें अवघडहि आहे. गर्दी असलेल्या एखाद्या डब्यांत हें काम करणें अतिशय कठीण जातें. एखाद्या उतारूला तिकिट तपासनिसानें पकडलें तर बहुतकरून इतर उतारूंची सहानुभूति तपासनिसाला न मिळतां तिकिटचुकव्या प्रवाशाला मिळते! ह्यावरून भारतामधील लोकांना सार्वजनिक मूल्यांची जाणीव कशी नाहीं, तें समजून येतें. तिकिटचुकव्या लोकांत सुशिक्षित तरुणहि असतात. जपानमध्यें उतारूंसाठी एक तिकिटाची पेटी स्टेशनांवरून ठेवलेली असते. प्रवासी इच्छित स्थळीं आला की आपण होऊन त्या पेटींत आपलें तिकिट टाकतो. ह्या आदर्शापासून आपण अद्याप खूपच लांब आहों. विनातिकिट प्रवासाच्या ज्या नमुना–तपासण्या रेल्वेतर्फे करण्यांत आल्या आहेत त्यावरून असें दिसतें की कांहीं भागांत ५० टक्के उतारू विनातिकिट प्रवास करीत असतात. विनातिकिट प्रवास करणार्‍या लोकांच्यामुळें भारतामधील रेल्वेचें ५ ते ६ कोटी रुपये उत्पन्न बुडतें असा अंदाज आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेंत रेल्वेवाहतुकीचें फार महत्त्व आहे. आणि आगामी काळांत तर रेल्वेवर खूपच ताण पडणार आहे. रेल्वेची होणारी हानि ही देशाचीच हानि असल्यानें लोकांनीं हा विनातिकिट प्रवास कमी करण्यासाठी रेल्वे नोकरांशीं सहकार्य करणें जरूर आहे.

### राज्य सरकारांचा योजनांवरील खर्च ( लक्ष रुपये )

| राज्य | दुसऱ्या योजनेंतील एकूण अंदाजी खर्च १ | १९५६–५७ २ | १९५७–५८ ३ | १९५८–५९ ४ | १९५९–६० ५ | (२+३+४+५) ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| आंध्र प्रदेश | १,७५,७४ | २४,३१ | ३१,१६ | ३५,०० | ४२,०३ | १,३२,५० |
| आसाम | ५७,९० | ९,२० | ९,५० | १०,७० | १२,२५ | ४१,६५ |
| बिहार | १,९०,०० | २५,१२ | २९,२२ | ३०,६६ | ४५,५४ | १,३०,५४ |
| मुंबई | ३,५०,२८ | ४६,९३ | ५१,२१ | ७८,२० | ९०,१८ | २,६६,५२ |
| केरळ | ८७,०१ | १०,८२ | १५,१२ | १८,५५ | २२,०२ | ६६,५१ |
| मध्यप्रदेश | १,९०,९० | १८,६० | २७,६२ | ३२,८३ | ३४,२२ | १,१३,२७ |
| मद्रास | १,५२,२७ | २८,४६ | ३०,२१ | ३४,८१ | ३४,६४ | १,२८,१२ |
| म्हैसूर | १,३६,०० | १८,७० | २१,०० | २५,०० | ३५,०० | ९९,७० |
| ओरिसा | ९९,९९ | १६,८३ | १७,१४ | १६,७६ | १९,७७ | ७०,५० |
| पंजाब | १,६२,६८ | २१,८६ | २६,७४ | ३२,७६ | ३५,४७ | १,१६,८३ |
| राजस्थान | १,०५,२७ | १३,९० | १५,३० | २०,१० | २४,०५ | ७३,३५ |
| उत्तर प्रदेश | २,५३,०० | ४३,३९ | ४०,२९ | ४७,५० | ५०,०० | १,८१,१८ |
| प. बंगाल | १,५५,७० | २२,१३ | २५,४० | ३४,०६ | ३७,७० | १,१९,२९ |
| एकूण | २१,१८,७४ | ३,००,२५ | ३,३९,९१ | ४,१६,९३ | ४,८२,८७ | १५,३९,९६ |

### उद्योगविनिमय केंद्रांची कामगिरी

| | केंद्रांची संख्या १ | वर्षांत नोंदलेले उमेदवार २ | उपलब्ध जागांची नोंद ३ | किती उमेदवारांना काम दिलें ४ | केंद्रांचा उपयोग करणारे मालक ५ | पटावरील शिल्लक उमेदवार ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५१ | १२६ | १,३७५,३५१ | ४८६,५३४ | ४१६,८५८ | ६,३६४ | ३२८,७१९ |
| १९५२ | १३१ | १,४७६,६९९ | ४२९,५५१ | ३५७,८२८ | ६,०२३ | ४३७,५७१ |
| १९५३ | १२६ | १,४०८,८०० | २५६,७०३ | १८५,४४३ | ४,३२० | ५२२,३६० |
| १९५४ | १२८ | १,४२५,४९७ | २३९,८७५ | १६२,४५१ | ४,५२६ | ६०९,७८० |
| १९५५ | १३६ | १,५८४,०२४ | २८०,५२३ | १६९,७३५ | ४,८८१ | ६९१,९५८ |
| १९५६ | १४३ | १,६६९,८९५ | २८७,६१८ | १८६,८५५ | ५,४३१ | ७५८,५०२ |
| १९५७ | १८१ | १,७७४,६६८ | २९७,१८८ | १९२,८३१ | ५,६३२ | ९२२,०९९ |
| १९५८ | २१२ | २,२०३,८८८ | ३६४,८८४ | २३३,३२० | ६,४८५ | १,१८३,२९९ |

### एक्सपोर्ट रिस्कस् इन्शुरन्स कॉर्पोरेशनचें कार्य

एक्सपोर्ट रिस्कस् इन्शुरन्स कॉर्पोरेशननें आपल्या द्वितीय वर्षाच्या ३० जून, १९५९ रोजीं संपलेल्या पहिल्या नऊ महिन्यांत १५९ विमापत्रें दिलीं. गेल्या सबंध वर्षातील हीच संख्या १४६ होती. विमेदार निर्यातदारांनीं २·९६ कोटी रुपये किंमतीच्या विमा उतरविलेल्या मालाची या कालावधींत निर्यात केली. गतवर्षीचा हाच आंकडा १·३० कोटी रुपये होता. या विमा पत्रांचें प्रिमियमचें उत्पन्न १·०३ लक्ष रुपये मिळालें. गतवर्षीतील हा आंकडा ४३,००० रुपये होता.

या कॉर्पोरेशनकडे ३० जून, १९५९ रोजीं ६·६४ कोटी रुपयांची कमाल जबाबदारी असलेलीं १९८ विमापत्रें होतीं.

सदर कॉर्पोरेशनचीं विमापत्रें जादा तारण म्हणून बँका स्वीकारतात. विमेदार निर्यातदार बोटीनें पाठवावयाच्या मालाची कांहीं नुकसानभरपाई द्यावी लागल्यास ती रक्कम देण्याचा अधिकार कॉर्पोरेशनला देऊन जादा तारण म्हणून हीं विमापत्रें पैसे पुरविणाऱ्या बँकेकडे ठेवतात. सदर नऊ महिन्यांत या कॉर्पोरेशननें अशीं ११०१ अधिकारपत्रें नोंदवून घेतलीं. गत-सालांतील हाच आंकडा ५८७ होता.

कॉर्पोरेशननें १४ ऑक्टोबर १९५७ रोजीं व्यवहारास प्रारंभ केल्यापासून नुकसानभरपाईच्या चार मागण्या आल्या. ३०,३६३ रुपये, १२ नया पैशांच्या दोन मागण्यांच्या रकमा चुकत्या करण्यांत आल्या. इतर दोन मागण्या करणाऱ्या निर्यातदारांनीं संबंधित अर्ज नीट भरून अद्याप सादर केलेले नाहींत. जरूर तर ते अर्ज व त्यासंबंधींच्या औपचारिक गोष्टी पुऱ्या होतांच त्यांस रकमा देण्यांत येतील. या मागण्या एकूण ४४,०७६ रुपये, ३३ नया पैशांच्या आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## औद्योगिक वसाहतींची प्रगति

देशांतील औद्योगिक वसाहतींचा भक्कम पाया घातला गेला आहे. निरनिराळ्या राज्यांतील औद्योगिक वसाहतींतील २१५ कारखान्यांत सध्या ३,५०० जणांस रोजगार मिळत आहे. या वसाहतींत दरवर्षी ३ कोटी, २५ लाख रुपयांहून अधिक किंमतीचा माल तयार होत आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत देशांत अकरा कोटी रुपये खर्च करून अशा ९७ वसाहती उभारणें संकल्पित आहे. त्यांपैकीं ३६ वसाहती बांधून झाल्या असून त्यांतील फॅक्टरी शेडसूची संख्या ८९९ असून त्यांपैकीं ५२० शेडस् चालू झाल्या आहेत. उरलेल्या ३७९ शेडस् लवकरच चालू होतील.

आणखी २४ औद्योगिक वसाहतींत बांधकाम चालू असून उरलेल्या ३७ वसाहतींसाठी जमीन मिळविण्यांत आली आहे आणि तेथें लवकरच बांधकामास सुरुवात होईल.

### ग्रामीण औद्योगिक वसाहती

या ९७ औद्योगिक वसाहतींपैकीं १९ ग्रामीण विभागांत स्थापन व्हावयाच्या असून त्यांपैकीं ४ वसाहती पूर्ण झाल्या आहेत. या १९ वसाहती तयार झाल्यावर तेथें शेतकी उद्योगधंदे आणि छोटे उद्योगधंदे सुरू करण्याचे प्रयत्न होतील. या ९७ वसाहती पूर्ण झाल्यावर तेथें ३,६०० फॅक्टरी शेडस् सुरू होऊन त्यांत ५०,००० लोकांस रोजगार मिळेल.

---

## फळांच्या आणि भाजीपाल्यांच्या पदार्थांची निर्यात

सन १९५८ मध्यें भारतांतून ४८ लक्ष रुपये किंमतीच्या एकूण २,५२३ टन फळांच्या आणि भाजीपाल्याच्या पदार्थांची निर्यात झाली. १९५७ मध्यें ३१.१३ लक्ष रुपये किंमतीचा अशा प्रकारचा १,७६३ टन माल परदेशांत पाठविण्यांत आला होता. यावरून १९५७ पेक्षा १९५८ मध्यें फळांच्या आणि भाजीपाल्याच्या पदार्थांची अधिक निर्यात झाल्याचें दिसून येईल. फळपदार्थांच्या निर्यातींत ३.१ लक्ष रुपये किंमतीची १२७ टन डबाबंद फळें होतीं.

भारत सरकारच्या शेतकी बाजारपेठ सल्लागारांकडून योग्य तो परवाना घेतल्याखेरीज, फळापासून पदार्थ तयार करतां येत नाहींत. तसेंच, दर्जानियंत्रणासाठी १९५५ मध्यें लागू करण्यांत आलेल्या फळपदार्थविषयक हुकुमांतील तरतुदींचें, हे पदार्थ तयार करणाऱ्या कारखानदाराला पालन करावें लागतें.

---

## भारतांतील विदेशी कंपन्यांच्या शाखा

भारतांत ५७२ विदेशी कंपन्यांच्या शाखा आहेत. ह्यापैकी २९५ कंपन्यांच्या शाखा पश्चिम बंगालमध्यें आहेत; मुंबई राज्यांत १६६ व मद्रास राज्यांत २६ आहेत; आसाममध्यें २९ व दिल्लींत २८ आहेत. ५७२ कंपन्यांपैकी ४४२ कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या कॉमनवेल्थमधील कुठल्यातरी देशांत आहेत, १३० कंपन्या इतर देशांतील आहेत. खंडांचे दृष्टीनें विचार केला, तर ४४४ कंपन्या युरोपांतल्या आणि ७२ कंपन्या उत्तर व दक्षिण अमेरिकेंतल्या आहेत. आशियांतील विदेशी कंपन्या ४६, ऑस्ट्रेलियांतील आठ व आफ्रिकेंतील दोन आहेत. ह्याच ५७२ कंपन्यांची देशवार वांटणी अशी आहे. ग्रेट ब्रिटन: ३९८, युनायटेड स्टेट्स: ५९, पाकिस्तान: १३, फ्रान्स: १३, प. जर्मनी: १२, जपान: १०. बाकीच्या कोणत्याच देशांतील दहाहि कंपन्यांच्या भारतांत शाखा नाहींत.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

**दि बेळगांव बँक लिमिटेड**

**बेळगांव**

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येतें.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत याची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंदुके. |

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

# कै. तात्यासाहेब मोहिते ह्यांचें स्मारक

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेंत शेतकरी सहकारी संघाचे मॅनेजिंग डायरेक्टर कै. तात्यासाहेब मोहिते यांचें स्मारक उभारण्यासंबंधीं विचार करण्यासाठीं डॉ. पी. सी. पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांची सभा भरून कै. मोहिते यांनीं केलेल्या कार्याबद्दलची माहिती बऱ्याच व्यक्तींनी करून देऊन त्यांचें स्मारक होणें जरूर असल्याचें प्रतिपादन केलें. कै. तात्यासाहेब मोहिते यांच्या नांवें सहकारी ट्रेनिंग स्कूल ऑफ बिझिनेस मॅनेजमेंट अँड मार्केटिंग व नवीन शाहू मार्केट यार्डमध्यें कै. मोहिते यांच्या पुतळा उभारावा, अशा स्मारकाबद्दल सूचना केल्या गेल्या. याबाबत निर्णय घेण्यासाठीं व निधि गोळा करण्यासाठीं डॉ. पी. सी. पाटील यांच्या अध्यक्षतेखालीं एक सतरा लोकांची समिति नेमण्यांत आली असून खजानीस श्री. गंगाराम चौगुले व सेक्रेटरीज म्हणून श्री. गजाननराव भोगांवकर, श्री. दादा हळदकर व श्री. जगताप गुरुजी यांची निवड करण्यांत आली.

कै. तात्यासाहेब मोहिते ह्यांच्या 'शेतकरी सहकारी संघ'रूपी जीवित-कार्याचा परिचय आम्हीं पृ. २३५ वर देत आहों.

## म्हैसूरजवळ कागदाची नवी गिरणी

म्हैसूरजवळ मंड्या ह्या ठिकाणीं कागद तयार करण्याची आणखी एक गिरणी काढण्यांत येणार आहे. गिरणीच्या स्थापनेसाठीं लागणारी प्राथमिक तयारी आतां पूर्ण होत आली आहे. कागदाच्या गिरणीसाठीं बांबूप्रमाणेंच उसाच्या चिपाडांचाहि उपयोग करतां येतो. साखर कारखान्यांतून वाया जाणाऱ्या उसाच्या चिपाडांचा कच्चा माल म्हणून उपयोग करणारा हा पहिलाच कारखाना असावा. मंड्या हें ठिकाण ह्या दृष्टीनें अतिशय सोयीचें आहे. कारण ह्या ठिकाणीं उसाचीं चिपाडें भरपूर प्रमाणांत उपलब्ध होण्यासारखीं आहेत. गिरणीसाठीं लागणाऱ्या भांडवलाची संपूर्ण माहिती अद्याप मिळत नाहीं. परंतु गिरणीसाठीं एकूण ३ कोटी रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज आहे. त्यापैकी २·४ कोटी रुपयांचे ऑर्डिनरी शेअर्स व ६० लाख रुपयांचे प्रेफरन्स शेअर्स असण्याची शक्यता आहे. गिरणीसाठीं लागणारी तांत्रिक मदत पारसन्स अँड व्हिटमोर ह्या प्रसिद्ध कारखान्याकडून मिळणार आहे. कागदाच्या कारखान्यांच्या उभारणींत ह्या कंपनीचा लौकिक सर्व जगभर पसरलेला आहे. तांत्रिक मदतीप्रमाणेंच वरील कंपनी भांडवलाच्या उभारणीसहि भरपूर हातभार लावणार असल्याचें समजतें. कंपनीच्या सहकार्यामुळें कागदाच्या कारखान्याचें यश निश्चित झालें आहे. आणखीहि एका गोष्टीची कारखान्याला चांगली मदत होणार आहे. भारतांत उसाच्या चिपाडापासून कागद तयार करणारा हा पहिलाच कारखाना आहे. ह्या प्रकारच्या कच्च्या मालापासून तयार होणारा कागद इतर कच्चा माल वापरणाऱ्या कारखान्यांपेक्षा बराच स्वस्त पडणार आहे. भारतामधील कागदाची मागणी एकसारखी वाढत आहे. अर्थातच, कारखान्याच्या मालाला तयार गिऱ्हाईक मिळण्याची पंचाईत पडणार नाहीं.

## पूर्व जर्मनीची बुटांची भारतांत खरेदी

जर्मन डेमोक्रॅटिक रिपब्लिकनें भारतांतून बुटांच्या ३,००,००० जोड्या आयात करण्याचें ठरविलें आहे. सध्या ज. डे. रिपब्लिकचे दोन तज्ज्ञ उत्तर भारतांत त्याबाबत पहाणीसाठीं हिंडत आहेत. तीन लक्ष बूट-जोड्या १९५९ अखेर भारतानें पुरवावयाच्या आहेत.

**दंतवैद्यक कॉलेजला मदत**—कलकत्ता दंतवैद्यक कॉलेजमध्यें अधिक विद्यार्थी घेतां यावे म्हणून मध्यवर्ती सरकारनें चालू व पुढील आर्थिक वर्षांत मदत देण्याचें ठरविलें आहे. सध्या कॉलेजमध्यें ३० विद्यार्थ्यांची सोय आहे, ती ४० ची होईल.

**प्रवासी कॉर्पोरेशनची स्थापना**— भारत सरकारच्या प्रवासी खात्याचें रूपांतर आयुर्विमा कॉर्पोरेशनसारख्या संस्थेंत होण्याचा संभव आहे. परदेशांतून येणाऱ्या हौशी प्रवाशांची संख्या दरसाल वाढत आहे. गेल्या वर्षी ५०,००० परदेशी प्रवाशांनीं भारताचे दौरे केले. ह्या धंद्यामुळें भारताला परदेशी चलनाची प्राप्तीहि चांगली होते. गेल्या सालीं हौशी प्रवाशांकडून भारताला २० कोटी रुपयांचें परदेशी चलन मिळालें.

**लोकर स्वच्छ करण्याचा कारखाना**—भारतांत लोकर स्वच्छ करण्याचा एक नवा कारखाना काढण्याची घोषणा एका ब्रिटिश कंपनीनें केली आहे. पश्चिम बंगालमधील जगतदाल ह्या ठिकाणीं हा कारखाना काढण्यास सरकारनें परवानगी दिली आहे. कारखान्यांत एका हिंदी कंपनीची भागीदारी आहे. कारखान्यांत लोकर साफ करणाऱ्या ३० यांत्रिक फण्या बसविण्यांत येतील.

**विजेची गरज भागविण्याचा उपाय**— भारतामधील जनतेचें राहणीचें मान वाढत आहे. ह्या राहणीला साजेशा प्रमाणांत विजेचा पुरवठा करावयाचा झाल्यास अणुशक्तीचा विजेच्या उत्पादनासाठीं उपयोग करण्याशिवाय गत्यंतर नाहीं असे उद्गार एका ब्रिटिश शास्त्रज्ञानें काढले आहेत. अणुशक्तीच्या उत्पादनासाठीं लागणारा कच्चा माल भारतांत भरपूर आहे असेंहि तो म्हणाला.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—भांडवल—

वसूल झालेलें भांडवल ...रु.३०,००,०००
गंगाजळी व इतर निधि...रु.१३,००,०००
एकूण खेळतें भांडवल ...रु. तेरा कोटींचे वर

संचालक मंडळ:

| | |
|---|---|
| श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) | श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) |
| श्री. धों. कृ. साठे | श्री. फ. दो. पदमजी |
| श्री. मा. वी. शहा | श्री. मा. म. गुते |
| श्री. म. बा. जांभेकर | श्री. म. स. पारखे |
| श्री. वि. सी. शिरगांवकर | श्री. ज. के. रेगे |

श्री. र. भि. बांठिया

भारत सरकारनें अलीकडेच काढलेले साडेतीन टक्क्यांचे कर्जरोखे (१९६९) दि बँक ऑफ महाराष्ट्र लि. नें एक कोटी रु. चे वर विकत घेऊन देशापुढील विविध योजनांना पाठिंबा दिला आहे.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

## कोल्हापूर शेतकरी सहकारी संघाचा धावता इतिहास

कोल्हापूर जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळवून देऊन निरनिराळया प्रकारच्या दलाल्या व काटछाट इत्यादि अनिष्ट व्यापारी प्रघातांतून शेतकऱ्यांची सोडवणूक करण्याच्या इरायानें कोल्हापुरांतील कांहीं कार्यकर्ते व अधिकारी यांनीं 'शेतकरी संघ' ही संस्था तारीख २३-१०-१९३९ रोजीं स्थापन केली. अशा प्रयत्नाला हितसंबंधी लोकांचा विरोधहि ठरलेलाच. तशांत भांडवलाचा अभाव. अशा अवघड परिस्थितींत संघानें तीन-चार वर्षे काढलीं. संघाचें ध्येय व धोरण चांगलें असलें तरी संघाचा प्रत्यक्ष व्यवहार चालविण्यासाठीं एका चांगल्या कार्यकर्त्याची जरूरी होती. संघाच्या संचालक मंडळानें १९४३ सालीं श्री. तात्यासाहेब मोहिते यांची संघाचे कार्यकारी संचालक म्हणून निवड केली.

सुरुवातीला त्यांना व्यापारी व संघांतीलच कांहीं कार्यकर्त्यांच्या विरोधांतून मार्ग काढून कार्य करावें लागलें. त्यांनीं संघाच्या व्यवहारांत धाडसानें पण चोखपणानें कार्य करण्यास सुरुवात केली व अल्पावधींतच शेतकऱ्यांचा पाठिंबा मिळविला व संघाचे सर्व व्यवहार प्रगतिपथावर आणले

वीस वर्षांपूर्वी संघाचें शाहुपुरी पेठेमध्यें एक लहानसें अडत दुकान होतें. त्याचीच आतां वाढ होऊन जिल्ह्यामध्यें ४० शाखा, १७ केंद्रें, वडगांवला १ तेलाची गिरणी, मिश्रखताचा कारखाना, बडोदा, अहमदाबाद, सुरत, नडियाद, इत्यादि लांबच्या ठिकाणीं संघाचा व्यवहार पाहणारे स्वतंत्र एजंटस्, अशा तऱ्हेनें संघाच्या कार्याचा विस्तार वाढला आहे. संघाचें मुख्य ध्येय कमींत कमी फायदा घेऊन अधिकांत अधिक शेतकऱ्यांची सेवा करण्याच्या दृष्टीनें प्रत्येक व्यवहार करण्याचें आहे.

### शेतकरी सहकारी संघाची पंधरा वर्षांतील प्रगति

| साल | सभासद संख्या | शेअर भांडवल ( रुपये ) | एकूण व्यवहार ( रुपये ) | नफा ( रुपये ) |
|---|---|---|---|---|
| १९४३ | ६४३ | ११,६७५ | ४५० | ० |
| १९४८ | २,१७० | १,१५,७५० | १,५२२ | ३२,०२५ |
| १९५३ | ३,१९९ | २,५०,१५० | ३,८७,९९ | ५६,१३९ |
| १९५८ | ११,८८० | २,७६,००० | ८,३५,००,००० | १,६४,००० |

शेतकऱ्यांनीं वर्षभर काबाडकष्ट करून पिकविलेल्या मालाला योग्य दर मिळवून देण्यांत संघानें यश मिळविलें आहे. नाहीतर सौद्यामध्यें व्यापारी ठरवतील तो दर व कापतील ती दलाली असा पूर्वीचा प्रघात होता. खरेदीचे व्यवहार संघाने सुरू केले. ज्या त्या वेळचे बाजारांतील दर पाहून संघाकडून सौद्यामध्यें एक-एक आण्याचा चढ सवाल बोलून योग्य दर येईपर्यंत सौदा बोलण्यास सुरुवात होते. त्यामुळें शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर येतो व अडवणुकीच्या धोरणानें कमी दरांत माल पदरीं पाडण्याचें धोरण बंद होतें. एखादे वेळीं कमी दरांतहि संघाच्या पदरीं माल पडतो. पण तोच माल कमी नफ्यावर ग्राहकास विकला जातो. त्यामुळें ग्राहकाचाहि फायदा अशा वेळीं होतो. गतसालीं संघामार्फत शेतकऱ्यांच्या ४,६०,०८४ गूळ रव्यांची विक्री झाली.

शेतकऱ्याचें उत्पादन वाढविण्यासाठी संघानें प्रयत्न केले. "संघाचें हें दुसरें कार्य फार महत्त्वाचें आहे. कारण, शेतकऱ्यांची पहिली गरज तर हीच आहे. त्यासाठी शेतकऱ्याला बी बियाणें, चांगलीं खतें, इत्यादींचा योग्य वेळीं व योग्य दरांत पुरवठा करणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत तर उसाचें पीक अत्यंत महत्त्वाचें आहे. या पिकासाठी अमोनियम सल्फेट व इतर पूरक खतें यांची अत्यंत जरूरी व हीं खतें तर खुल्या बाजारांत योग्य भावानें मिळणें अशक्यच होतें. यासाठीच संघानें सल्फेटची एजन्सी मिळवून शेतकऱ्याला योग्य दरांत या खतांचा पुरवठा केला. खुल्या बाजारांत सल्फेटच्या पोत्याचा दर पोत्यामागें ३८ रु. असतांना संघाने ३६ रु., ४ आण्याला सल्फेट पोतीं विकलीं. त्यामुळें काळया बाजाराला तर आळा बसलाच, पण संघाविषयीं शेतकऱ्यांत आपलेपणा निर्माण झाला. पूरक खतें हीं बाजारांत खात्रीचीं मिळत नाहींत. यासाठी संघानें स्वतःचें बैलछाप मिश्र खत शास्त्रीय पद्धतीनें करण्यास सुरुवात करून त्याचा शेतकऱ्यांना पुरवठा केला. गत सालीं संघानें सुमारें साडेएकेचाळीस लाख रु. चीं खतें विकलीं. केवळ नफा हें धोरण संघानें ठरविलें असतें, तर योग्य दर ठेवूनहि लाखों रुपयांचा अधिक फायदा या खतविक्रीमध्येंच मिळाला असता.

खताइतकीच पाणीपुरवठ्यासाठी लागणाऱ्या क्रूड ऑइल इत्यादि तेलांची गरज शेतकऱ्याला असते. त्याचाहि पुरवठा संघानें सुरू केला. यासाठी तेलाच्या टाक्या बांधलेल्या आपल्या मालकीच्या मोटरी संघानें ठेवल्या आहेत. गेल्या एका वर्षांत संघानें दहा लाख गॅलन क्रूड ऑइल व सदुसष्ट हजार गॅलन रॉकेल विकलें. शक्य तों जवळच्या खेड्यावर या तेलांचा पुरवठा शेतकऱ्याला केला जातो. पस्तीस मैलांवर असलेल्या गारगोटी गांवींहि क्रूड ऑइलचा तोच दर व कोल्हापुरांतहि तोच दर. या सेवेमुळें शेतकऱ्यांचा किती फायदा व सोय झाली असेल याची कल्पना सहज येईल.

तसेंच शेतकऱ्याला आपल्या जमिनीची शास्त्रीय पद्धतीनें तपासणी करून घेतां यावी म्हणून संघानें हजारो रुपये खर्चून एका तज्ज्ञाच्या देखरेखीखालीं रसायनशाळा सुरू केली आहे. याबाबत शेतकऱ्याला मोफत सल्ला देण्यांत येतो. त्यामुळें आपल्या जमिनींत कोणतें पीक चांगलें येईल व कोणत्या खतांचा किती वापर करणें जरूर आहे याची शास्त्रीय माहिती शेतकऱ्याला मोफत देण्यांत येतें. यामुळें त्यांच्या शेतीच्या उत्पादनांत खात्रीनें वाढ झालेली दिसून येतें.

अशा तऱ्हेनें शेतकऱ्यांच्या अत्यंत गरजेचे व्यवहार संघानें हातीं घेतल्यामुळें संघाचे सभासद इतरहि अडचणी संघापुढें मांडूं लागले. यांतूनच संघाला कापड व इतर नित्योपयोगी वस्तूंचें दुकान, तेलाची गिरणी, मिश्र खत तयार करण्याचा कारखाना, औषधाचें दुकान, वगैरे सुरू करावें लागलें.

संघाला लाखो रुपयांचा फायदा दरवर्षी होतो. फायद्यांतील ठराविक रक्कम संघाच्या सभासदांना वांटण्यांत येतें. त्याची पोच देण्याची संघाची पद्धत मात्र निराळी आहे. संघाचे नोकर खेडूत सभासदांच्या घरीं जाऊन त्यांची फायद्याची रक्कम घरपोंच देत असतात. इतक्या आपुलकीनें आपल्या शेअर्सच्या फायद्याची रक्कम घरपोंच मिळाल्यामुळें त्यांना समाधान वाटतें. ठराविक टक्क्यांपेक्षा फायद्याची वांटणी न करण्याचें बंधन पाळूनहि शेतकऱ्याच्या शंभर रुपयांच्या शेअर्समागें आतांपर्यंत ९९ रु. ८ आणे फायदा वांटण्यांत संघानें यश मिळविलें आहे. अशा प्रसंगीं संघाच्या नोकराला तो जेवूं घालून परत पाठवितो. हाच सभासद गरजेच्या वेळीं आपल्या संघाच्या कचेरींत आला कीं त्याची व त्याच्या घरीं पाहुणचार घेऊन आलेल्या संघाच्या नोकराची गाठ पडते व त्या शेतकऱ्यांची अडचण लागलीच दूर होते. त्यामुळें संघाचे कार्यकर्ते व सभासद यांच्यांत सहकार्याची साखळी निर्माण झालेली आहे. संघाकडे चार लाख, पंचाण्व हजार रुपयांच्या ठेवी स्वखुषीनें आल्या आहेत. यावरूनहि संघावरचा शेतकऱ्यांचा विश्वास दिसून येतो.

बँकांचीं उद्योगधंद्यांना कर्जे ( लक्ष रुपये )

| धंद्याचा प्रकार | शेड्यूल्ड बँका | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|
| ( १ ) व्यापार | | | |
| १ घाऊक व्यापार ... | ११९,४८ | ५,५२ | १२५,०० |
| २ किरकोळ व्यापार ... | २३,९२ | ३,१३ | २७,०५ |
| ३ सरकारी रोख्यांचा व्यापार | ४,६३ | ३२ | ४,९५ |
| ४ सोने चांदीचा व्यापार ... | १,४७ | २१ | १,६७ |
| ५ सावकारी ... | १३,९३ | ३९ | १४,३२ |
| ६ निर्गत करणारे ... | ९,३१ | २५ | ९,५६ |
| ७ आयात करणारे ... | ५,६३ | — | ५,६३ |
| ८ इतर व्यापारी ... | ११,२३ | १,२३ | १२,४६ |
| एकूण ... | १८९,५९ | ११,०५ | २००,६५ |
| (२) पब्लिक युटिलिटीज इ. | | | |
| ९ पब्लिक युटिलिटीज ... | १,४० | ८८ | २,२८ |
| १० बांधकाम ... | २,१२ | ५४ | २,६६ |
| ११ सर्व्हिसेस ... | १,७३ | १७ | १,८९ |
| एकूण ... | ५,२५ | १,५९ | ६,८४ |
| ( ३ ) कारखानदारी | | | |
| १२ कपास-कापड ... | २,४५ | ५५ | ३,०१ |
| १३ इतर कापड ... | ४,२९ | २ | ४,३१ |
| १४ साखर ... | ७७ | — | ७७ |
| १५ भात गिरण्या ... | १,९६ | ९ | २,०४ |
| १६ इतर अन्नें, तंबाखू ... | ७,०१ | १० | ७,११ |
| १७ लोखंड, पोलाद ... | ३,९९ | २७ | ४,२५ |
| १८ कातडी ... | २८ | ३ | ३१ |
| १९ वनस्पति तेल गाळणें ... | ४,४५ | ३० | ४,७५ |
| २० रंग ... | १,१३ | ९ | १,२२ |
| २१ कागद-कार्डबोर्ड ... | ५४ | ३ | ५७ |
| २२ चटया, दोरखंड ... | १,०६ | ५ | १ ११ |
| २३ साबण ... | १० | २ | १३ |
| २४ छापखाने ... | ५९ | ५ | ६४ |
| २५ इतर कारखाने ... | १५,२२ | ६८ | १५,९१ |
| एकूण | ४३,८३ | २,२८ | ४६,११ |
| ( ४ ) शेती | १,४२ | १० | १,५२ |
| ( ५ ) इतर सर्व | १ ६८ | ५ | १,७३ |
| १ ते ५ ची बेरीज ... | २४१,७७ | १५,०७ | २५६,८४ |

इनकमटॅक्सची आकारणी ( कोटी रुपये )

| वर्ष | किती जणांवर आकारणी (हजार) | किती उत्पन्नावर | कर-आकारणी | कर-वसुली |
|---|---|---|---|---|
| १९५०-५१ | ४,७२ | ५७५ | १५१ | १७३ |
| १९५१-५२ | ६,४७ | ७८३ | १९६ | १८८ |
| १९५२-५३ | ५,३२ | ७११ | २०० | १८५ |
| १९५३-५४ | ५,०६ | ७८१ | १९० | १६४ |
| १९५४-५५ | ४,९६ | ७६० | १७७ | १६६ |
| १९५५-५६ | ५,२८ | ७८५ | १८२ | १६८ |
| १९५६-५७ | ५,८० | ९३६ | २१७ | २०३ |
| १९५७-५८ | ६,७३ | १०११ | २२२ | २२० |


# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष

मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष

रु. १ कोटी, २५ लक्ष

गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष

एकूण ठेवी : रु. १२ कोटी

खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर

१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड

मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस-*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.*

शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.

लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३१-१२-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,४३,००० |
| ठेवी | रु. | १,५०,००,०३० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,७१,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | १·५० |
| चालू डिपॉझिट | " | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.